**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. महादेव बाबुराव घुले
मधुबन अपार्टमेंट, फ्लॅट नं. ९
वाडिया रोड, राजगुरुनगर,
जि. पुणे **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक,**
उच्च शिक्षण, पुणे विभाग, **उत्तरवादी**
पुणे -१

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
सह संचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालय,
पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०१० |
| ३ | <u>उपस्थित</u><br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक,**<br>उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे -१<br>डॉ. एन.एम.कडू<br><br>**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**<br>सह संचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालय,<br>पुणे -१<br>श्री. अ.नि.सोरटे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/९/२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/१०/२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** करिअर ॲडव्हान्समेंट अंतर्गत सन १९८७ ते २००४ या कालावधीतील वेतन देय फरक मिळणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. महादेव बाबूराव घुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील प्रकरणी दि. २४/२/२०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी 'आपली कोणतीही तक्रार राहिली नसल्याने अपील निकाली काढावे', असे अपिलकर्त्याचे दि. २२/२/२०१० रोजीचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण डॉ. एन.एम.कडू यांनी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**पुणे.**
**दि :-** 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. सुशांत सुभाष मोरे
४, केशर कॉम्पलेक्स,
३४, पंताचा गोट, सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक धर्मादाय आयुक्त,
राजधानी टॉवर्स, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान ट्रस्ट,
महाबळेश्वर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६/२००९/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.८.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.९.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१२.२००८ |
| ५ | <u>मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी</u> :- श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान ट्रस्टचे सन २००५, २००६, २००७ व २००८ चे लेखापरीक्षा अहवाल, जमीनीची खरेदी विक्री,तद्नुषंगिक माहिती | |

**<u>विवेचन</u>**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते याबाबतचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री.सुशांत सुभाष मोरे यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दाखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**स्थळ : पुणे**
**दिनांक :** 26 FEB 2010

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे
२१. सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
संजय गांधी निराधार योजना, शहर सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे
२१, सिध्देश्वरनगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठजवळ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
संजय गांधी निराधार योजना, शहर सोलापूर श्रीमती अरूणा सयाजीराव गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

लिपिकाने लाच घेतल्याचा जबाब लाभार्थ्याने दिल्याच्या संदर्भातील माहिती आपण मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, सोलापूर शहर यांनी ती दिली नाही. माहिती तयार असून अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांकडून ती प्राप्त करून घ्यावी, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी निर्णयात नमूद केले. परंतु जीविताला/शारिरिक सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(१)(छ) अन्वये नमूद करून माहिती नाकारली. अडीच वर्षे माहिती न मिळाल्यामुळे आपल्याला झालेल्या खर्चाची भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी केली.

श्री.अक्कलकोटे यांनी माहिती देण्यात आली असून तत्कालीन तहसीलदार निवृत्त झाले आहेत. आपण स्वत:सुध्दा माहिती दिली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, सोलापूर शहर श्रीमती अरूणा सयाजीराव गायकवाड यांनी केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, सोलापूर शहर यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीविषयी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्रीमती अरूणा सयाजीराव गायकवाड यांनी दि.३.६.२००९ च्या पत्रान्वये खुलासा आयोगाला सादर केला. माहिती मागणीच्या

काळात जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे प्रमुख लिपिक हा मूळ कारभार व अन्य तीन अतिरिक्त कार्यभार होते. त्यामुळे माहिती विहित मुदतीत देण्याची कार्यवाही करता आली नाही. तथापि श्री.अक्कलकोटे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले होते, असे श्रीमती अरूणा सयाजीराव गायकवाड यांनी खुलाशात विस्ताराने नमूद केले आहे. त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. महादेव भगवान लोंढे
मु. पो. गागरगांव,
ता. इंदापूर, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती इंदापूर,
जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत निमगांव केतकी ,
ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७४/पुणे+१६४१/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/७/२००७, २४/१०/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/९/२००७, २१/११/२००७ |
| ४ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** निमगांव केतकी ग्रामपंचायती मार्फत सन २००६ पासून करण्यात आलेली सर्व कामे, तसेच सदर कामांशी संबंधित कागदपत्रांच्या नकला मजुरांची हजेरी पत्रके, शेती मालकांचे ७/१२ उतारे इ. माहिती | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. महादेव भगवान लोंढे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलांचा समावेश दि. २६/११/२००८ व दि. १८/३/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'-मध्ये करण्यात आला होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,

निमगांव केतकी ग्रामपंचायत यांनी अपिलकर्त्यास माहिती दिली असल्याचे नमूद केले. तसेच माहिती प्राप्त झाली असून आपली काही एक तक्रार नसल्याचे अपिलकर्त्याने लेखी निवेदन देखील जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रासोबत सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत .

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद भिकाजी भोर
मु.पो.नारायणगाव (कुकडी वसाहत),
ता.जुन्नर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>१५७७/पुणे</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि.१६.०२.२०१०</td></tr>
<tr><td>३.</td><td colspan="2">उपस्थित<br>अपीलकर्ता श्री.अरविंद भिकाजी भोर<br>मु.पो.नारायणगाव (कुकडी वसाहत),<br>ता.जुन्नर, जि.पुणे<br>अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,<br>जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.धनाजी तोरस्कर<br>जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,<br>जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.राजेंद्र गणपत शेळके</td></tr>
<tr><td>४</td><td>जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख</td><td>दि.६.८.२००६</td></tr>
<tr><td>५</td><td>प्रथम अपिलाची तारीख</td><td>दि.१४.११.२००७</td></tr>
<tr><td>६</td><td>अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख</td><td>दि.२६.१२.२००७</td></tr>
<tr><td>७</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## <u>विवेचन</u>

एकत्रिकरण योजनेनंतर केलेल्या फेरफारानुसार ७/१२ केलेला नाही. आपल्या जमिनीच्या, हिस्सा क्र.४ चा ७/१२ वर अंमल केलेला नसल्यामुळे त्यानुसार ७/१२ करुन देणे आवश्यक आहे. तो दिला जात नसल्यामुळे आपले नुकसान होत आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अरविंद भिकाजी भोर यांनी केली.

अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार चार हिस्से पडल्याची नोंद नाही. चौथ्या हिश्श्याची नोंद नसल्यामुळे तसा ७/१२ देता येत नाही. ऊर्वरीत ३ पोट हिश्श्यांनुसार उतारे दिले आहेत. जमिनीच्या नोंदणीत दुरुस्ती करावयाची असल्यास अपीलकर्त्यांनी उपसंचालक,भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे, याची त्यांना वेळोवेळी कल्पना देण्यात आलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,जुन्नर तहसील कार्यालय, ता.जुन्नर,जि.पुणे श्री.राजेंद्र गणपत शेळके यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याने मर्जीतर नियमानुसार आवश्यक त्या प्रक्रियेचा अवलंब करावा. नोंदीतील चुकीची दुरुस्ती अथवा प्रशासकीय कार्यवाहीच्या गफलतीबाबतची कारवाई ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अजित सिंग पाल
पॅलेसिया ए बिल्डिंग, फ्लॅट नं.६, दुसरा मजला,
युटोपिया सहकारी गृहरचना संस्था मर्या., वानवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(२), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी),
अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३७ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अजित सिंग पाल
पॅलेसिया ए बिल्डिंग, फ्लॅट नं.६, दुसरा मजला,
युटोपिया सहकारी गृहरचना संस्था मर्या., वानवडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी),
अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.सोबले

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अजित सिंग पाल
पॅलेसिया ए बिल्डिंग, फ्लॅट नं.६, दुसरा मजला,
युटोपिया सहकारी गृहरचना संस्था मर्या., वानवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(२), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी),
अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३७ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अजित सिंग पाल
पॅलेसिया ए बिल्डिंग, फ्लॅट नं.६, दुसरा मजला,
युटोपिया सहकारी गृहरचना संस्था मर्या., वानवडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी),
अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.सोबले

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अजित सिंग पाल
पॅलेसिया ए बिल्डिंग, फ्लॅट नं.६, दुसरा मजला,
युटोपिया सहकारी गृहरचना संस्था मर्या., वानवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(२), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी),
अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३७ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अजित सिंग पाल
पॅलेसिया ए बिल्डिंग, फ्लॅट नं.६, दुसरा मजला,
युटोपिया सहकारी गृहरचना संस्था मर्या., वानवडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी),
अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.सोबले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत आपण वेळोवेळी पाठविलेल्या पत्रांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची योग्य माहिती आपल्याला मिळाली नाही. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(दोन), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी संस्थेतील अनियमिततांची दखल घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होते. त्यांनी चौकशीही केली, परंतु पुढील कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अजित सिंग पाल यांनी केली.

श्री.अजितसिंग पाल यांनी युटोपिया सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत विविध स्वरूपाच्या तक्रारी विविध अर्जांद्वारे केल्या होत्या. संस्थेकडील माहितीबाबत संस्थेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्याला लागू होत नसल्याचे कळविले. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(दोन), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी कागदपत्रांच्या प्रती देण्याचा आदेश अपिलाच्या सुनावणीच्या वेळी संस्थेला दिला. त्यानुसार त्या त्या वेळी संस्थेने कागदपत्रांच्या प्रती दिल्या. श्री.अजितसिंग पाल यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्या अनुषंगाने केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत त्यांना देण्यात आली असून संस्थेवर पुढील कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी), अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(दोन), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.सोबले यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.अजितसिंग पाल यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि त्या विषयीचीही माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) संस्थेबाबत सुरू करण्यात आलेल्या कायदेशीर कारवाईच्या प्रक्रियेविषयीच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी), अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(दोन), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी त्वरित नि:शुल्क द्याव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती परवीन बशीर शेख
डी-६, वेस्ट व्ह्यू हौसिंग सोसायटी,
सॅलिसबरी पार्क, पुणे -३७

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,**
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय,
५, फायनान्स रोड, शासकिय छायाचित्र नोंदणी कार्यालय,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहदुय्यम निबंधक,**
हवेली क्र.१, मामलेदार कचेरी आवार,
शुक्रवार पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/२/२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,**<br>मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय,<br>५, फायनान्स रोड, शासकिय छायाचित्र नोंदणी कार्यालय,पुणे<br>श्री. सी.बी.भुरकुंडे<br>**जन माहिती अधिकारी तथा सहदुय्यम निबंधक**<br>हवेली क्र.१, मामलेदार कचेरी आवार, शुक्रवार पेठ, पुणे<br>श्री. पांडुरंग गणपत काटवटे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/१०/२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/११/२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४/१२/२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** दस्त क्र. ५३४४/१९९४ दि. १५/१०/१९९४ मिळणे संदर्भातील एकूण तीन मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

'आवश्यक असलेली माहिती मिळालेली असल्याने आपले अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्त्या श्रीमती परवीन बशीर शेख यांनी राज्य माहिती आयोगाला दि.१७/२/२०१० रोजी सुनावणीच्या वेळी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. तानाजी माधवराव सोनवणे
मु. पो. राहू, ता. दौंड,
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था, सहकार भवन, दौंड,
जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
राहू विविध कार्यकारी सेवा संस्था,
राहू, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७६ /पुणे +३८२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**<br>सहकारी संस्था, सहकार भवन, दौंड, जि. पुणे<br>श्री. बाळासाहेब मुरलीधर तावरे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**<br>राहू विविध कार्यकारी सेवा संस्था,<br>राहू, ता. दौंड, जि. पुणे<br>श्री. रामदास बापू झारगे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/११/२००७ व १/१२/२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३/१२/२००७ ------ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६/१२/२००७ व १९/१/२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/२/२००९ ------ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ' ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. तानाजी माधवराव सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या वर नमूद दोन्ही अपिलांवर दि. २३/२/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली अपीलकर्ता श्री. सोनवणे हे गैरहजर होते. संस्थेने देय माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपीलकर्त्याने काही बाबतीत 'खुलाशाची मागणी ' केली असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

दोन्ही अपिले अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 25 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. डॉ. संदीप विठ्ठल रोहकले **अपीलकर्ता**
व्दारा श्री. सोमनाथ खोले
'जयपार्वतीकुंज',शेटे बंगला, नाना भालेराव कॉलनी,
मु. पो. तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव ,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
पुणे -१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०८/पुणे + १७२३/पुणे + २६५७/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/८/०७ + २२/११/०७ + १६/७/०८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६/९/०७ + १९/१२/०७ + ११/८/०८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/१०/०७ + २८/१२/०७ + २०/८/०८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८/१/०८ |
| ६ | **माहिती - मागणी अर्जाच्या (जोडपत्र 'अ') छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.** | |

## विवेचन

अपीलकर्ता डॉ. संदीप विठ्ठल रोहकले यांनी राज्य माहिती आयोगाकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याविरुध्द केलेल्या अपिलांमधील (अपील क्र.२४०/पुणे +२७२/पुणे) कागदपत्रे व अनुषंगिक कार्यवाही बाबतच्या कागदपत्रांची मागणी केली आहे.

सदरहू कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, यांनी वेळीच उपलब्ध करुन दिली आहेत. तसेच आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलांची पाहणी /अवलोकनास देण्याचेही जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता श्री. रोहकले कळविले आहे. तथापि अपीलकर्ता त्यास उपस्थित राहिले नाहीत, अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, यांनी देखील यासंदर्भात अपीलकर्त्यास वेळीच अवगत केले आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरिल अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विजयकुमार मोहनराव घाटगे
खटकाळी, साल-वाडा रोड,
घोडेगांव, ता. आंबेगाव,
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक,**
पुणे विभाग, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता**<br>श्री. विजयकुमार मोहनराव घाटगे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**<br>पुणे विभाग, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१<br>श्री. सुनिल मगर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक,**<br>पुणे विभाग, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१<br>श्री. व. मा. गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/१२/२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/१/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/१/२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** शैक्षणिक वर्षे २००६-०७ मध्ये वृत्तपत्रात जाहिराती देऊन नेमणुका केलेल्या उमेदवारांच्या मान्यतेसंदर्भात व तदनुषंगिक माहिती | |

## विवेचन

'आपल्याला सर्व माहिती मिळालेली असल्याने अपील निकाली काढावे,' असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. विजयकुमार मोहनराव घाटगे यांनी दि. २४/२/२०१० रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अरुण रामभाऊ पन्धे
३६, बालाजी गार्डन,
सुखसागरनगर भाग-२, ८ वी गल्ली,
कात्रज, पुणे ४११ ०४३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,
हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स स्कूल, प्राथमिक विभाग,
पिंपरी,पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५८/२००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०६.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.०८.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.०८.२००९ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.अरुण रामभाऊ पन्धे यांना मूळ माहिती-मागणी अर्जानंतर माहिती प्रापत झाली नाही. उलट त्याकामी एक लिपिक व एक शिपाई यांच्या नियुक्तीच्या खर्चासाठी रु.७,५००/- ची अवाजवी मागणी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ.स्नेहल घार्गे यांनी त्यांचे पत्र जा.क्र.सी/१२७/२००९-१०,दि.३१.०८.२००९ अन्वये केल्याचे श्री.पन्धे यांनी आयोगास अवगत केले असून प्रथम अपिलाची काहीही दखल न घेतल्याने राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

"या प्रकरणी आयोगाच्या आदेशासाठी सुनावणीची आवश्यकता वाटत नाही व तशी माझी मागणीही नाही. मी अत्यंत सरळ शब्दात माहिती विचारलेली असून त्यामध्ये कोणतेही वाद असण्याचा निर्माण करण्याचा कोणताही प्रश्न माझ्यापुरता तरी निश्चित नाही." असे श्री.पन्धे यांनी त्यांचे पत्र दि.०१.०१.२०१० मध्ये स्पष्ट केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स स्कूल (प्राथमिक विभाग), पिंपरी, सौ.स्नेहल घार्गे यांनी त्यांचे पत्र जा.क्र.सी-१२७/२००९-१०, दि.३१.०८.२००९ अन्वये माहितीचे अर्जदार श्री.पन्धे यांचेकडे माहितीसाठी रु.७,५००/- च्या शुल्काची केलेली मागणी माहितीचा अधिकार अधिनिमय,२००५ नुसार अवाजवी व नियमबाह्य असल्याने याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे. तसेच श्री.पन्धे यांना देय ठरणारी माहिती त्वरित द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल दि.१०.०३.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २० अन्वये शास्ती व अनुषंगिक कारवाईस त्या पात्र ठरतील.

पुणे
दिनांक : १५/०२/२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.रविंद्र दत्तात्रय जाधव
मु.पो. नातेपुते, टिळक चौक,
ता. माळशिरस,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
डॉ. ज.बा.दाते प्रशाला व कनिष्ठ विद्यालय,
नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६/२०१० सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७/७/०९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/८/०९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, फॅक्स नंबर इ. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रविंद्र दत्तात्रय जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती मागणी अर्जासाठी एकत्रित अपील केले आहे तसेच अपिलासोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नाही.

सबब त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. 20 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७७ / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.काशिनाथ मोरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे सासवड व निरा येथील गेल्या ९९ वर्षातील भाडे कराराने दिलेल्या जागा, अपार्टमेंट कायद्यानुसार झालेल्या इमारती, शासकीय भूखंड वापरणाऱ्यांची नावे व पत्ते, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण इ. बाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु चारपैकी फक्त एका मुद्दयाची माहिती दिली. विहित मुदतीत व पूर्ण माहिती न दिल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नामदेव बाबासाहेब खरात यांनी केली.

आपल्या कार्यालयाकडील माहिती श्री.खरात यांना दिली. अन्य माहिती आपल्याकडे नसल्याचे कळविले. शासकीय भूखंडांच्या वापराबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व अतिक्रमणाबाबतची माहिती तलाठ्यांकडे उपलब्ध होऊ शकते. तसेच अपार्टमेंट कायदा सासवड निरा या गावांना लागू होत नसल्यामुळे त्यानुसार नोंदी नाहीत, असे श्री.खरात यांना स्पष्ट करण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.काशिनाथ मोरे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे. तथापि जिल्हाधिकारी कार्यालय व गावकामगार तलाठी यांना कळवून त्यांच्याकडील माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करून देणे उचित ठरेल.

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील भाडेकराराच्या जागांसंदर्भातील रजिस्टरची प्रत आठ दिवसांत नि:शुल्क देऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच तलाठयांकडे असणारी अतिक्रमणाची माहिती देण्याबाबत गावकामगार तलाठी, सासवड व निरा यांना जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे यांनी कळवावे व या पत्राची प्रत आयोगाला सादर करावी. संबंधित गावकामगार तलाठी यांनी योग्य ते शुल्क आकारून अपीलकर्त्यास दि.१०.३.२०१० पर्यंत माहिती देऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६ .२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. गोविंद आबाजी वाघोलीकर
ए -४/आर बी -४, रेल्वे क्वॉर्टर्स,
शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे -३७

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक (माध्यमिक)**
डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/७/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७/८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/१०/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७/११/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती - मागणी अर्ज (जोडपत्र 'अ' ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गोविंद आबाजी वाघोलीकर यांनी 'आपणास आवश्यक असणारी माहिती प्राप्त झाली असल्याने अपील मागे घेत असल्याबाबतचे' निवेदन दि. २२/२/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 25 FEB 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ